# - प्रकल्प रिपोर्ट -

**सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी**

**बँक लिमिटेड सांगली स्थापनेचा आराखडा.**

## प्रकरण तिसरे

### ३.१ प्रस्तावना :-

सांगली जिल्हा कृष्णा, वारणा, माण व अग्रणी या प्रमुख नद्यांच्या किना-यावर पसरलेला आहे. तो १७$\frac{1}{2}$ उत्तर रेखांश व ७४$\frac{1}{2}$ पूर्व रेखांशा मध्ये विस्तारला आहे. जिल्ह्याचा आकार पूर्व पश्चिम लांबट चिंचोळा आहे. एकूण क्षेत्रफळ ८६०१.५ चौरस किलोमीटर आहे. १९९१ च्या जणगणनेनुसार सांगली जिल्ह्याची लोकसंख्या १८.३४.२९३ आहे. पूर्वीच्या संस्थानाची व आ आजच्या सांगली जिल्ह्याची राजधानी सांगली शहर हे कृष्णा नदीच्या काठावर वसलेले टुमदार शहर आहे. ऐतिहासिक दृष्टीकोनातूनही सांगली शहराला महत्व प्राप्त झाले आहे. येथून दोन मैलावरच कृष्णा व वारणा या दोन नद्यांचा संगम असून संगमावर हरिपूर हे क्षेत्र वसलेले आहे. जिल्ह्यांत आठ तालुके असून ८०० गावांचा समावेश आहे.

पूर्वी हे संस्थानाचे ठिकाण होते. तेथील राजघराण्याने शहराचा विकास होण्यासाठी मदत केली आहे. सर्व क्षेत्रात सांगली जिल्ह्याचा विकास झालेला आहे.

### ३.२ सांगली जिल्ह्याचे भौगोलिक स्थान :-

#### १) उद्योगधंदे -

सांगली येथे जवळच माधवनगरला वसंतदादा सहकारी साखर कारखाना हा आशिया खंडातील सर्वात मोठा कारखाना आहे. गजानन मिल ही कापड गिरणी नगरपालिकेच्या हद्दित आहे. तर जनता गिरणी व भारत सहकारी सुत गिरणी हद्दीबाहेर आहेत. कागद गिरणी काढण्याची योजना आहे. या मोठ्या उद्योगांशिवाय लघु व कुटिर उद्योगांचाही विकास झाला आहे. येथे कुक्कूटपालन हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालतो.

२) शेती -

कृष्णा, वारणा, येरळा, अग्रणी या चार नद्यांनी सांगली जिल्ह्याचा निम्मा परिसर सुपीक बनविलेला आहे. शेतीमधून ऊस, गहू, हरबरा, ज्वारी, भूईमुग ही पिके घेतली जातात. याशिवाय द्राक्ष उत्पादन व केळी उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. या व्यापारी पिकापासून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळते. नदी काठापासून लाब असलेले कवठे-महांकाळ जवळ आटपाडी, तासगांव, खानापूर तसेच मिरज तालुक्याचा पूर्व भाग असा निम्मा सांगली जिल्हा कमी पावसाचा हलक्या प्रतीची जमीन असलेला व दुष्काळी असा आहे. त्यामुळेच तेथील शेतीचा विकास म्हणावा तितका झालेला नाही. या भागात काही प्रमाणात पाणीपुरवठ्याच्या सोई करण्यात आल्या आहेत.

३) व्यापार -

येथे मोठे मार्केटयार्ड असून येथे हळद, शेंगा, मिरची इत्यादी वस्तू व्यापारासाठी येतात.

४) शिक्षण -

सांगली जिल्ह्यात विविध प्रकारची शिक्षण देण्याची सोय आहे. शिवाजी विद्यापीठ व एस.एन.डी.टी. विद्यापीठ यांना संलग्न असलेली विविध शाखांची महाविद्यालये येथे आहेत.

५) दळणवळण -

सभोवतालच्या सर्व मोठ्या शहरी पक्के रस्ते गेले असून बस, ट्रक, मोटारी यांनी वाहतूक चालते. सांगली रेल्वे स्टेशनहून ब्रॉडगेज मार्ग आहे. सांगली मिरजसाठी सिटीबसची सोय आहे. येथे बसस्टॅण्ड आणि रेल्वे स्टेशनही आहे.

याशिवाय नगरवाचनालय, सिव्हिल हॉस्पीटल, वस्तू संग्रहालय, प्रतापसिंह उद्यान, आंबराई, दत्तमंदीर, गणपती मंदीर हे भाग पाहण्याजोगे आहेत. या सर्व वैशिष्ठ्यांमुळे महाराष्ट्रातील एक प्रगत जिल्हा असा या जिल्ह्याचा नावलौकिक आहे.

### ३.३ सांगली जिल्ह्यातील सहकारी चळवळ :-

सांगली जिल्ह्यात पहिल्या सहकारी बँकेची स्थापना ४ नोव्हेंबर, १९३५ रोजी "सांगली अर्बन को-ऑपरेटिव्ह" या नावाने स्थापन झाली. यानंतर सांगली जिल्ह्यात सहकारी बँकांचा विकास हळूहळू घडून आला. आज सांगली जिल्ह्यात एकूण २२ सहकारी बँका आहेत. सांगली जिल्ह्यात पगारी नोकरदार यांची एकच बँक असून, "सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, सांगली" या नावाने कार्यरत आहे.

### ३.४ सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, सांगली :-

#### इतिहास -

प्राथमिक शिक्षकांच्या आशा आकांक्षा पूर्ण करून त्यांची आर्थिक स्थिती सुधारणेच्या हेतूने सांगली जिल्ह्यातील साहित्य क्षेत्रातील एक कर्तबगार प्राथमिक शिक्षक कै. कृ.भा. बाबर यांनी या बँकेची सन १९२४ साली मसूर, ता. कराड, जि.सातारा येथे स्थापन केली. सांगली जिल्ह्याची विभागणी झालेनंतर तारीख ४.११.१९५२ रोजी ही बँक रजिस्टर झाली. बँकेचे पहिले चेअरमन कै. ज्ञानदेव दत्तात्रय पाटील, अंकलखोप उर्फ दाजी गुरूजी यांनी कामास सुरूवात केली.

## ३.५ शाखा विस्तार :-

सांगली जिल्ह्यात जिल्हा परिषद व नगरपालिका यामधील एकूण १०,००० शिक्षकांपैकी आपल्या बँकेचे ८,२९० सभासद आहेत. सभासदांनी बँकेकडे येण्यापेक्षा त्यांचा रजा, वेळ, पैसा यांची बचत करुन जास्तीत जास्त सुलभ रितीने कर्ज घता यावे यासाठी तालुकावार शाखा इस्लामपूर, शिराळा, तासगांव, मिरज, आटपाडी, विटा, कवठेमहांकाळ, जत या ठिकाणी शाखा काढल्या. त्याचा कारभारही फायद्यात आहे. त्यामुळे सभासदांना आपल्या ठेवी ठेऊन बँकेचा उपयोग करुन घेता आला. तालुका ठिकाणापासून दूर असणाऱ्या ग्रामीण भागातही आष्टा, रामानंदनगर, कडेगांव व आरग येथेही शाखा काढल्या असून, खरसुंडी, बिळाशी, माडग्याळ, संख, खानापूर, ढालगांव व ताकारी या ग्रामीण भागात शाखा परवानगी करीता रिझर्व्ह बँकेकडे मागणी केली आहे.

## ३.६ बँकेचे सामाजिक जाणीवेतून स्तुत्य उपक्रम :-

### १) गुणी मुलांना पारितोषिक :-

सभासदांच्या हुशार मुलांना प्रोत्साहन द्यावे, कौतुक करावे व त्यांनी अधिक जोमाने अभ्यास करुन जीवनात यशस्वी व्हावे याकरिता सन १९७२ पासून योजना चालू आहे. चालू वर्षी १७५ मुलांना पारितोषिक देऊन गौरव केला. जाणार आहे. याशिवाय मिडल स्कूल, हायस्कूल, स्कॉलरशिप, शिष्यवृत्ती धारक, सैनिक स्कूल, पब्लिक स्कूल मध्ये प्रवेश घेतलेले मुलांचाही गौरव केला जाणार आहे.

### २) मयत सभासदांचे पगार तारणी कर्जास सुट :-

संस्थेने मयत सभासद कल्याण ठेवीच्या व्याजातून मयत सभासदांची संस्थेकडे असणारी शिल्लक हा त्यांच्या कर्जातून जमा करुन राहिलेल्या येणे कर्जास सुट देण्याची व्यवस्था आहे.

३) मयत सभासदास तातडीने मदत :-

बँकेच्या सभासदाचा अकस्मात मृत्यू झाला तर यापूर्वी ५०० मात्र तातडीची मदत दिली जात होती. दिनांक १.१०.१९९४ पासून रुपये १,०००/- मात्र मदत दिली जाणार आहे.

४) संस्थेच्या इमारती :-

बँकेच्या एकूण शाखा १२ असून तासगांव, आटपाडी, इस्लामपूर येथे इमारत बांधण्यात आली आहे. विटा येथे यापूर्वीच जागा घेतली असून, तेथे इमारत बांधकाम करण्याचा संचालक मंडळ विचाराधीन आहे. तसेच इतर शाखांना जागा घेऊन इमारत बांधण्याचा संचालक मंडळ विचाराधीन आहे.

५) शिक्षक भवन :-

जिल्ह्याच्या ठिकाणी सभासदांचा विसावा व जरूर तर मुक्काम करता यावा, याकरिता मुख्य कार्यालयामध्ये व्यवस्था केली जात आहे.

३.७ सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., सांगली

संचालक मंडळ सन १९९३-९४ :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. बाळासाहेब दिनकरराव देशमुख | - | चेअरमन |
| २) | मा. महिबूब मीरासाहेब मुशरिफ | - | व्हा.चेअरमन |
| ३) | मा. प्रदीप राजगोंडा पाटील | - | संचालक |
| ४) | मा. रघुनाथ कृष्णा पाटील | - | संचालक |
| ५) | मा. पांडुरंग दादा हंकारे | - | संचालक |
| ६) | मा. हणमंतराव परशराम पाटील | - | संचालक |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | मा. दत्तात्रय मायाप्पा हक्के | - | संचालक |
| ८) | मा. विश्वनाथ लक्ष्मण मिरजकर | - | संचालक |
| ९) | मा. मारुती रामचंद्र पाटील | - | संचालक |
| १०) | प्रा. श्रीपती चंदू घोडे | - | संचालक |
| ११) | मा. गोपाळ नाना सुर्यवंशी | - | संचालक |
| १२) | मा. सर्जेराव रामचंद्र जगताप | - | संचालक |
| १३) | मा. सुरेंद्र शंकर कपठेकर | - | संचालक |
| १४) | मा. गणपती रामचंद्र मोहिते | - | संचालक |
| १५) | मा. आण्णा बाजी कोळी | - | संचालक |
| १६) | मा. शिवाजीराव शिदू कदम | - | संचालक |
| १७) | मा. संभाजी आकाराम पाटील | - | संचालक |
| १८) | मा. शंकरराव नाना परापले | - | डी.सी.सी.बँक प्रतिनीधी |
| १९) | श्री एस.के. पाटील | - | मॅनेजर |
| २०) | मा. व्ही.व्ही. येवारे | - | लोकल ऑडीटर |
| २१) | मा. एन.डी. कांबळे | - | सरकारी ऑडिटर |

कायदे सल्लागार -

| | | |
|---|---|---|
| मा. जे.जी. पाटील | - | ॲडव्होकेट |
| मा. पंडितराव सावंत | - | ॲडव्होकेट |
| मा.सौ. एस.एस. बामणे | - | ॲडव्होकेट |

### ३.८ नागरी सहकारी बँकामध्ये सांगली जिल्हा शिक्षक बँकेची भूमिका :-

समाजातील अनेक घटकामधील प्राथमिक शिक्षक हा घटक महत्वाचा व प्रमुख घटक मानला जातो. समाजाचा भावी नागरीक सर्वगुन संपन्न असून, त्यांचा पाया भक्कम करण्याची त्यांचेवरती मोठी जबाबदारी असते. म्हणून हा समाजातील महत्वाचा घटक मानला आहे.

या प्राथमिक शिक्षकांनी आपली जबाबदारी पार पाडीत असताना आपला आदर्श समाजात कायम रहावा, यासाठी आपली आर्थिक उन्नती होणे गरजेचे आहे. हे ध्येय डोळ्यासमोर ठेऊन या कल्पनेतून या शिक्षक बँकेची दिनांक ४.११.१९५२ रोजी स्थापना झाली. ही बँक शिक्षकांना हातभार लावण्यात कमी पडलेली नाही.

१) कमीत कमी व्याजदरामध्ये जास्तीत जास्त कर्ज देण्याचा या बँकेचा मनोदय आहे.

२) सर्व कारणाकरिता कर्ज देण्याची धडाडी व यशस्वी प्रयोग. उदा. सोने गहाण कर्ज सुविधा, घर बांधणी कर्ज सुविधा.

३) या घटकाने समाजाच्या उगमस्थानी असना-या मुलांचा विकास करण्याचे व्रत जसे घेतलेले आहे. तसेच आपला मुलगाही समाजात विकसित व्हावा यासाठी मुलाचे उच्च शिक्षणासाठी या कामधेनूमार्फत रु.१०,०००/- पर्यन्त कर्ज देण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे.

४) आजच्या देशाच्या बदलत्या परिस्थितीचा विचार लक्षात घेऊन देशाच्या विकास कार्यक्रमामध्ये भाग घेणे ही काळाची गरज ओळखून या कामधेनूने आपल्या सुशिक्षित बेरोजगार मुलांना आपल्या पायावरती उभा रहाता यावे याकरिता या बँकेने लघूउद्योग व्यवसायासाठी त्यांना कर्ज देण्यास नुकतीच सुरूवात केली आहे.

५) इतर बँकाप्रमाणे ही बँक सर्व प्रकारच्या ठेवी स्विकारते. त्यात एक वेगळेपण म्हणजे ही बँक, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका पेक्षा १ ते १/२ % व्याजदर ठेवीदारांना जादा देत आहे. यामुळे ठेवी वाढीमध्ये ही कामधेनू आघाडी मारुन आपली घोडदौड पुढेच चालू ठेवीत आहे.

६) बँकेची वसुली ही १००% असल्याने या बँकेची प्रतिमा ही बँकिंग क्षेत्रात नावाजण्यासारखी आहे.

७) या बँकेने कर्मचारी वर्गासही जास्तीत जास्त फायदा देण्याचा प्रयत्न करुन एक मोठा आदर्श या समाजामध्ये बँकिंग क्षेत्रात केलेला आहे.

अशा अनेकविध योजना नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रामध्ये राबवून आपली कार्यपध्दतीची वेगळी अशी भूमिका बँकेने समाजात दाखवून दिलेली आहे.

## ३.९ सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, सांगली स्थापनेपासून प्रगती :-

श्री गणेश देवताच्या सुंदर सांगली मध्ये हुतात्मा आण्णासाहेब पत्रावळे मार्गावर एक सुंदर व भव्य अशी इमारत डौलाने उभी राहीली आहे. ती शिक्षक बँक - नव्यानेच उभी राहीली आहे. या बँकेच्या रुपाने शिक्षकांच्या आशा, आकांक्षा आणि त्यांचे कर्तुत्व उभा राहीले आहे. ही सुंदर व सुशोभित वास्तू म्हणजे सा-या शिक्षक समाजाची अस्मिता होय.

१९५२ साली स्थापन झालेल्या या इवल्याशा रोपाचे आज गगनावरी जाणा-या वेलीत रुपांतर झाले आहे. या छोट्याशा बीजाचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. हा वृक्ष अनेक योजना आणि उपक्रम यांनी फुलत आहे. त्याला अनेक फळे,फुले आली आहेत. त्याच्या सावलीत शिक्षकांच्या जीवनात सुख व समाधान मिळत आहे. अनेक शाखांच्या रुपाने ही बँक सामान्य मानसापर्यन्त पोहचली आहे.

सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, सांगली स्थापनेपासून (१९५२) प्रगती दर्शक तक्ता पुढीलप्रमाणे :-

सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., सांगली स्थापनेपासूनचा प्रगतीचा आढावा.

| सन | सभासद | शेअर भांडवल | रिझर्व्ह फंड | इतर फंड | गुंतवणूक | क्लीन कॅश क्रेडिट | सभासद कर्ज | मि. व्याज | ठेवी | नि. नफा | खेळते भांडवल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १९५२-५३ | १, ४२० | १, ४६, ७४० | १४, ८१८ | ६, ५६९ | ३, २६० | - | २, ८१, १०० | २०, ८६२ | १६, २४० | ७, ८२७ | ३, १७, ३१७ |
| १९५३-५४ | १, ९११ | १, ३४, ९५० | १६, ५१० | ८, ७७२ | ३, २६० | ३८, ९७४ | २, ८१, १०० | २१, १६५ | ७, ९४७ | १२, ७०५ | २, १९, ८५८ |
| १९५४-५५ | १, ८८२ | १, २७, ६३० | १९, ०३५ | ६, ४३७ | ८, २६० | - | ३, ७३, ९३५ | २२, ६१५ | २५, ३२८ | ८, ७३० | ४, ११, ५६९ |
| १९५५-५६ | २, ००७ | ३, २०, ९०० | २१, ०३१ | ७, ७१४ | ८, २६० | - | ४, २१, ९२६ | १८, ४१५ | ४०, ८५७ | ११, ८२४ | ४, ७३, ६५३ |
| १९५६-५७ | २, ३१९ | ३, ११, ६४० | २४, ३३६ | १३, ४३२ | १९, ४४२ | - | ५, २३, ६२४ | ३०, ६२३ | ६८, ५०८ | १६, ०५१ | ५, ६३, ९०३ |
| १९५७-५८ | २, ६९२ | ४, ५६, ३४० | २८, ७७४ | ११, ७६७ | ३३, २४२ | ५०, ००० | ७, ०६, ७३९ | ३४, ६९९ | ९०, १२५ | १८, ००६ | ७, ६८, ८३२ |
| १९५८-५९ | ३, ०३५ | ५, ५२, ३८० | ३३, ६९२ | १४, ०२४ | ३३, २४२ | ७५, ४४२ | ८, २४, २४६ | ४६, ३७४ | १, ४०, ३३२ | २१, १८४ | ८, ९७, ३९६ |
| १९५९-६० | ३, २२२ | ५, ३०, ५२० | ३९, २४४ | १५, ४८२ | २९, २४२ | ९४, २४७ | ९, ९३, ७९६ | ५२, ८१३ | १, ५१, ४०० | २५, १०३ | १०, ९८, १६६ |
| १९६०-६१ | ३, ३८१ | ७, १२, ५४० | ४५, ७४५ | १४, ८७७ | ४५, २५२ | - | १०, ९५, ५४८ | ५९, ०९९ | १, ७९, १९४ | ३२, १८३ | १२, २१, ००५ |
| १९६१-६२ | ३, ३९७ | ९, ०४, ०५० | ५४, ००२ | १६, ८३४ | ६५, २४२ | १, ६७, ०३४ | १५, ४६, ६२४ | ७६, ९७९ | २, ५३, ९१९ | ४७, ८०८ | १६, ६८, ८०६ |
| १९६२-६३ | ३, ५४७ | १३, २९, ९२३ | ६४, ४११ | १६, ८३४ | - | १, ६७, ०३४ | १९, ७६, ६२१ | - | २, ८१, ६६३ | ४७, ५४३ | २१, ०६, २९२ |
| १९६३-६४ | ३, ६६४ | १५, ०३, ४७५ | ७६, ४४१ | ६, ६४५ | ७०, २४२ | १८, ३९४ | १६, ९३, ३२५ | १, ३८, ८८८ | २, २५, २२१ | ७९, ३८७ | १९, २२, ९२७ |
| १९६४-६५ | ३, ७४८ | १७, १८, १७३ | ८४, ४९२ | १३, ४५५ | ७०, ६३२ | १, ९६, ८०५ | १९, २०, ६०१ | १, ३९, ४७५ | १, ५२, २४२ | ७७, ०९८ | २३, ६६, ४१० |
| १९६५-६६ | ३, ८४९ | २०, ५४, ०६० | ९२, ४२० | १५, ९५० | ७५, ६३२ | ६७, ७०६ | २०, ६६, ७१४ | १, ८०, ७५९ | १, ०८, ९९१ | १, ०५, ३५५ | २३, ६३, ६२१ |
| १९६६-६७ | ३, ८९६ | १०, ७४, ३१० | १, ०३, ०६७ | २२, ४६३ | ७५, ६३२ | - | २०, ९९, ९०३ | १, ४०, ८७२ | ११, ०९, ४०४ | २४, ००८ | २४, ५९, ०३९ |
| १९६७-६८ | ४, ०६१ | ११, ५०, ४०० | १, ०८, ३४७ | २१, ०४१ | ७५, ६३२ | ३९८ | २२, ९८, ४५१ | १, ४८, ५०५ | १२, ८९, १६३ | २७, १४६ | २६, ८६, ३२९ |
| १९६८-६९ | ४, ३९० | १२· १३, ९८० | १, २०, २९५ | २६, ३७७ | ७५, ६३२ | - | २५, २३, ६२० | १, ५३, ९८४ | १४, ६७, ७६४ | २१, ५१५ | २९, ५४, ८१५ |
| १९६९-७० | ४, ५०६ | ३१, ०२, ९२० | १, २७, ८६९ | २९, ६२१ | १, १७, ६३२ | ८, २९, ७९० | ३८, ३७, ९०० | २, ६०, ८०० | ९५, ८५३ | १, ०६, ५५७ | ४३, ४५, ९६० |
| १९७०-७१ | ४, ७४९ | ३७, २९, ४४० | १, ५५, ८२२ | ३४, १४९ | ९२, ६३२ | ७, ९२, २४४ | ४४, ७८, ३४० | ३, ११, ३४० | १, ०७, २५३ | १, ५१, २५६ | ५०, २०, ३०६ |
| १९७१-७२ | ५, ०१२ | ४१, १८, ५४० | १, ७२, ७५० | ६४, ३४९ | १, ८३, २०० | १४, ३५, ८२० | ५८, ५१, ६६७ | ४, ३६, ०६२ | ४, ७५, ०४५ | १, ७४, ५५२ | ६५, ५१, ९२८ |
| १९७२-७३ | ५, ४२८ | ४५, ३९, ६३० | १, ९०, ८०७ | ९१, ७२८ | २, ०८, २०० | ८, २६, ९४८ | ६२, ६६, ३३७ | ५, ५७, १८० | १०, ४६, ५९८ | १, २५, ९७६ | ७०, ७६, ८७४ |
| १९७३-७४ | ५, ८३१ | ५०, ०५, ६०० | २, ०४, ०१३ | १, २१, ७३६ | २, ६९, २०० | १६, ४६, २९९ | ७७, ८२, ४९१ | ६, ८१, ०६२ | १५, ७८, १०८ | ९३,३०२ | ८९, ८६, ७३० |
| १९७४-७५ | ६, २७५ | ५३, ७९, ५८० | २, ९९, २५३ | ६४, ५८५ | २, ८९, १०० | २०, ००, ४५६ | ९०, ०५, ५५५ | ८, ५१, १२८ | २०, ७४, २८२ | १, ०६, १०१ | १, ०२, ६३, ११० |

...

## ३.१० अभ्यासपध्दती :-

समाजवादी समाजरचना स्थापन करण्याचे एक प्रमुख साधन म्हणून भारतातील सहकारी चळवळीकडे पाहिले जाते. भारतातील सहकारी चळवळीने मानवी जीवनाची सर्व अंगे उपांगे व्यापली असून ती अधिक विविध अंगी व विकसीत होत आहेत. त्यामध्ये नागरी सहकारी बँकांनीही एक विशेष स्थान प्राप्त केलेले आहे. त्यामध्ये सांगली जिल्ह्यातील सहकारी चळवळीने नेत्रदिपक यश संपादन केले आहे. यामध्ये छोटे व्यापारी लघु उद्योजक, व्यवसायिक छोटे तंत्रज्ञ, छोटे कारागीर, छोटे वितरक, शहरी विभागातील नोकरदार, पगारदार यासारखे सामाजिक घटक आणि विशेषत: समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गाला अर्थसहाय्य करणाऱ्या नागरी सहकारी बँका यांना भारताच्या आर्थिक विकासाच्या क्षेत्रात महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे नागरी सहकारी बँकांची कार्य-पध्दती पहाणे आवश्यक ठरते.

## ३.११ अभ्यासाची सारेषा :-

नागरी सहकारी बँकांचा अभ्यास करावयाचा म्हटल्यास सर्वच नागरी सहकारी बँकांची कार्यपध्दती अभ्यासने अडचणीचे ठरते. त्यामुळे प्रस्तुत अभ्यासासाठी "प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड,सांगली" या बँकेची निवड केली. पगारी नोकरदारांची ही एकच बँक सांगली जिल्ह्यात आहे. ही बँक सांगली शहरातील नागरी बँकिंग चळवळीतील एक प्रगतशील बँक आहे. प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडविण्याच्या हेतूनेच प्रामुख्याने या बँकेची स्थापना झाली आहे.

सांगली शहरातील नागरी सहकारी बँकेच्या अभ्यासावरुन म्हणजेच प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेच्या अभ्यासावरुन काढलेले निष्कर्ष सर्वच नागरी सहकारी बँकांना अगदी तंतोतंत सर्वत्र खरे ठरतीलच असे नाही. परंतु किमान काही नागरी सहकारी बँकेच्या कार्यपध्दतीचा अंदाज बांधता येईल. प्रस्तुत

अभ्यासामध्ये तुलनात्मक अभ्यास पध्दती नसल्याने आणि अभ्यासाची व्याप्ती एकाच नागरी सहकारी बँकेपुरती मर्यादित असल्याने येणा-या निष्कर्षांची व्याप्ती देखील मर्यादितच ठरणार आहे. प्राथमिक शिक्षक सहकारी बँकेची कार्यपध्दती कशी असेल, ठेवी, कर्ज, गुंतवणूक या बाबींची परिस्थिती काय आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न सदरच्या अभ्यासामध्ये केला आहे. या अभ्यासाची जी उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली आहेत ती पुढीलप्रमाणे :-

३.१२ अभ्यासाचा उद्देश :-

१) महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीचा आढावा घेणे.

२) सांगली शहरातील नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीचा आणि प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड सांगली या बँकेच्या स्थापनेचा आढावा घेणे.

३) प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड सांगली या बँकेच्या वित्तीय स्थितीचा आढावा घेणे.

४) अभ्यासाद्वारे काढलेले निष्कर्ष मांडणे.

५) आलेल्या निष्कर्षांवरून काही उपाय सुचविणे.

३.१३ तथ्य संकलन :-

नागरी सहकारी बँकेच्या कार्यपध्दतीचा अभ्यास करण्यासाठी "प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, सांगली" या पगारी नोकरदारांच्या बँकेची निवड केली आहे. सदरच्या संशोधनासाठी बँकेची माहिती मिळविण्यासाठी

संचालक मंडळ व व्यवस्थापक यांची भेट घेऊन अभ्यासाचा हेतू स्पष्ट करुन चर्चा केली. त्या मिळणा-या माहितीचे संकलन केले आहे. त्याचप्रमाणे हा अभ्यास दुय्यम सामुग्री व प्रश्नावलीच्या सहाय्याने करण्यात आला आहे. दुय्यम सामुग्रीमध्ये "प्राथमिक शिक्षक बँकेचे" वार्षिक अहवाल, विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशने, विविध समित्यांचे अहवाल, नियतकालिके, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थेची कागदपत्रे इत्यादींचा वापर करण्यात आला आहे. तसेच बँकेचे व्यवस्थापक व संचालक यांची भेट घेऊन प्रश्नावलीच्या सहाय्याने बँकेच्या संदर्भात मुलाखत घेऊन त्याचा उपयोग संशोधन प्रकल्पासाठी केला आहे.

३.१४ <u>अभ्यासाची योजना</u> :-

१) प्रकरण पहिले यामध्ये सहकाराचा अर्थ, उगम, व्याख्या, उद्दिष्ट्ये, तत्वे व व भारतातील सहकारी चळवळ याचा आढावा घेतला आहे.

२) दुस-या प्रकरणात नागरी सहकारी बँकांचा थोडक्यात आढावा घेतला आहे.

३) तिस-या प्रकरणात "प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड, सांगली" या बँकेची स्थापना व अभ्यासाची रुपरेषा याविषयी विवेचन केले आहे.

४) चौथ्या प्रकरणात प्राथमिक शिक्षक बँकेची आर्थिक प्रगती, शेअर भांडवल, खेळते भांडवल, सभासद संख्या, ठेवी, बँकेची कर्जे, शाखा विस्तार, या विविध बाबींचा अभ्यास केला आहे.

५) पाचव्या प्रकरणात प्राथमिक शिक्षक बँकेची कर्ज योजना, कर्जाची विभागणी बँकेची गुंतवणूक याचा आढावा घेतला आहे.

६) उत्पन्न, खर्च, निव्वळ नफा, भविष्यकालीन योजना या बाबींचा विचार केला आहे.

७) सातव्या प्रकरणात प्राथमिक शिक्षक बँकेच्या संचालक मंडळाची बँक विषयक माहिती, बँकेच्या अभ्यासा आधारे काढलेली निष्कर्ष त्यावरील उपाय

३.१५ अभ्यासाच्या मर्यादा :-

१) "प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लिमिटेड,सांगली" या बँकेच्या आर्थिक स्थितीच्या संदर्भात काढलेले निष्कर्ष सर्वच नागरी सहकारी बँकांना लागू होतीलच असे नाही.

२) प्राथमिक शिक्षक बँकेच्या एकूण कार्यपध्दतीवरुन आणि बँकेच्या सभासदांच्या आर्थिक स्थितीवरुन काढलेले निष्कर्ष सर्वसामान्य प्रवृत्तीदर्शक असले तरी ते सर्वच नागरी सहकारी बँकांना जसेच्या तसे लागू पडतीलच असे नाही. मात्र या अभ्यासावरुन प्राथमिक शिक्षक बँकेच्या अभ्यासाची कल्पना येऊ शकेल.

## संदर्भ


१) सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., सांगली - माहिती पुस्तिका.

२) सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., सांगली - स्मरणिका १९९१.

३) मे जिल्हा उपनिबंधक कार्यालय, सांगली.

४) सांगली जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी बँक लि., सांगली - अहवाल.

5) Journal of Shivaji University, (Science) Vol.19-1979.
- M.G. Jadhav and
S.D. Shinde.